नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १३५ | Issue - 135 | वार गुरुवार दि. २ ऑक्टोबर २०२५ | Blow- Thursday Date 2 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# एसटीची प्रस्तावित १० टक्के भाडेवाढ रद्द

## सर्वसामान्यांची दिवाळी गोड होणार; उपमुख्यमंत्री शिंदेंच्या निर्देशानंतर परिवहन मंत्र्यांचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आताच्या घडीची सर्वात मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे. एसटी महामंडळाने १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यात येणार होती. पण या भाडेवाढवरुन सर्वसाम ान्यांमध्ये नाराजी व्यक्त केली जात होती. जनभावना ओळखून सरकारने हा निर्णय मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानंतर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हंगामी भाडेवाढ मागे घेत असल्याची मोठी घोषणा केली. यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाने महाराष्ट्रातील जनतेला आता नेहमीच्या भाडेनुसार एसटीचा प्रवास करता येणार आहे. यामुळे ऐन दिवाळीत सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.



दिवाळी निमित्त १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या काळासाठी एसटीकडून हंगामी भाडेवाढ करण्यात येणार होती. ही भाडेवाढ तब्बल १० टक्के इतकी होती. पण यामुळे राज्यभरात नाराजी व्यक्त केली जात होती. ग्रामीण भागातील जनता ही सर्वाधिकपणे एसटी बसने प्रवास करते. त्यामुळे ग्रामीण म हाराष्ट्राला त्याचा फटका बसला असता. याशिवाय एसटी बसने गावी जाणाऱ्या शहरी भागातील नागरिकांनादेखील यामुळे जास्तीचे पैसे मोजावे लागले असते. अखेर सरकारने हंगामी भाडेवाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे.

दरवर्षी दिवाळीला हंगामी भाडेवाढ केली जाते. त्यामुळे याव- र्षीदेखील ती करण्यात येणार होती. पण राज्यात सध्या ओला दुष्काळ पडला आहे. अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रम ाणात नुकसान झालं आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे. अनेक संसार उद्धवस्त झाले आहेत. घरांची पडझड झाली आहे. गावात, घरात पाणी शिरलं आहे. अनेक घरांमध्ये चिखलाचं सम्राराज्य आहे. अशा या संकट काळात महाराष्ट्रातील जनतेला पुन्हा उभं करण्याचं मोठं आव्हान सरकार पुढे आहे. राज्यातील जनता इतक्या अडचणीत असताना एसटीची भाडेवाढ करणं त्यांना परवडणार नाही. यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाडेवाढ मागे घेण्याची सूचना परिवहन विभागाला केली होती. त्यानुसार परिवहन मंत्र्यांनी एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

एसटी महामंडळ दरवर्षी दिवाळीच्या काळात दहा टक्के भाडेवाढ करीत असते. यातून साधारणपणे महामंडळाला ३० कोटी रुपयांचा महसूल मिळतो. मात्र यंदा राज्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती लक्षात घेवून अपवाद म्हणून महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के भाडेवाढ रद्द करण्याबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे.

### ८ ऑक्टोबरपासून राज्यातून
# मान्सून निरोप घेणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस कोसळताना दिसत आहे. अनेक भागात नदी नाल्यांना पूर आला आहे. त्यामुळं शेती पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. त्यामुळं पडणारा पाऊस कधी थांबणार असा सवाल शेतकरी करत आ- हेत. अशातच एक महत्वाची बातमी समोर आली आहे. येत्या ८ ऑक्टोबर पासून मान्सून राज्यातून निरोप घेणार असल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे.

२९ सप्टेंबरपासून राज्यातील बहुतांश भागात हवामान स्थिर आहे. मात्र २ ते ७ ऑक्टोबर दरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे, जो प्रामुख्याने मेघ गर्जनेसह राहील आणि दुपारनंतर पडेल. वादळी पावसाची सर्वात अधिक शक्यता विदर्भात राहील. काढणी केलेली पिके पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावीत, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. ७ ऑक्टोबरपासून राज्यात हवाम ान स्थिर होण्यास सुरुवात होईल. सुमारे ८ ऑक्टोबरपासून मान्सून राज्यातून निरोप घेईल. त्यानंतर पुढच्या काही दिवसातच संपूर्ण राज्यातून मान्सून निरोप घेईल अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे.

राज्यातील बहुतांश भागात २९ सप्टेंबर २०२५ पासून हवामान स्थिर आहे. मात्र २



ते ७ ऑक्टोबर २०२५ दरम्यान विदर्भ, मराठवाडा, आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे, जो प्रामुख्याने मेघगर्जनेसह राहील आणि दुपारनंतर पडेल. वादळी पावसाची सर्वाधिक शक्यता विदर्भात राहील. काढणी केलेली पिके पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावीत, असे आव- ाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. राज्यात ७ ऑक्टोबर २०२५ पासून हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल, आणि सुमारे ८ ऑक्टोबर २०२५ पा- सून मान्सून राज्यातून निरोप घेईल. त्यानंतर पुढच्या काही दिवसातच संपूर्ण राज्यातून मान- सून निरोप घेईल, अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे.

# जि.प. आणि पंचायत समितीची आरक्षण सोडत ठरली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची आरक्षण सोडत कधी होणार? असा सवाल करण्यात येत होता. अखेर याबाबतची प्रतीक्षा संपली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी १३ ऑक्टोबरला आरक्षण सोडत असणार आहे. राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्यपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने (डींरींश एश्रशलींळेप उेााळीीळेप) केली आहे. त्याचबरोबर नगरपरिषद, नगरपंचायतींची प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार आहे.

### नगरपरिषद, नगरपंचायतींची प्रारुप मतदार यादीची ८ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

संबंधित जिल्हाधिकारी १० ऑक्टोबर २०२५ रोजी वृत्तपत्रांत आ- रक्षण सोडतीसंदर्भातील सूचना प्रसिद्ध करतील. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सोडत काढल्यानंतर प्रारूप आरक्षणा- ची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १४ ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून ३ नोव्हेंबर २०२५ रोजी शासन राजपत्रात अंतिम आरक्षण प्रसिद्ध केले जाणार आहेत.

राज्यातील २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदाच्या व थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे. प्राभगनिहाय प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केली जाईल.

प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये म तदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. या याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इत्यादी स्वरूपाची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुका, मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे,



विधानसभेच्या यादीत नाव असू- नही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील दुरूस्त्या याबाबत हरकती व सूचना मतदार दाखल करू शकतात.

# शेतकरी भाजपात आल्यानंतरच कर्जमुक्ती करणार का? उद्धव ठाकरेंचा सवाल

मुंबई : महाराष्ट्रावर अतिवृष्टीचं संकट आहे, मी देखील अतिवृष्टीच्या (ठरळप) ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. सरकारला हात जोडून, राजकारण न आणण्याची आणि एकत्र येऊन मार्ग काढण्याची विनंती केली आहे. मात्र, मुख्यमंत्री जाहिरातीत व्यस्त आहेत, एक उपमुख्यमंत्री पाकिटावर आपले फोटो लावण्यात व्यस्त तर दुसरे उपमुख्यमंत्री कुठेही नसतात आणि शेतकरी वाऱ्यावर पडला आहे, असे म्हणत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी (णव- वहर्री ढहरलज्ञशीू) राज्यातील पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी (ऋॠीशीी) हेक्टरी ५० हजार रुपये तातडीने मदत करण्याची मागणी केली आहे. यावेळी, ठाकरेंनी अजित पवार आणि एकनाथ शिंदेंवरही नाव न घेता टीका केली. तसेच, ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या १५ रुपयांवरुनही उद्धव ठाकरेंनी संताप व्यक्त केला. तसेच, ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या १५ रुपयांवरुन संताप व्यक्त केला. साखर सम्राटाप्रम ाणे शेतकरीही भाजपात आल्यावरच कर्जमाफी करणार का? असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारला.

# वाहत्या पाण्यात बसून हेक्टरी ५० हजार रुपयांच्या मदतीसाठी आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : म हाराष्ट्रामध्ये अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात अडकला आहे.अक्कलकोट तालुक्यातही मोठ्या प्रमाणामध्ये अतिवृष्टी निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचे पीक हे कवडीमोल झाला आहे. शेतकऱ्यांचे गुरे वाहून गेलेले आहेत. शेतकऱ्यांचे शेतातील माती वाहून गेली आहे. शेतकरी हा हवालदील झाला आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे तो जगला पाहिजे, यासाठी किणी येथे युवा व्याख्याते सागर सोनकांबळे यांच्या नेतृत्वाखाली अतिवृष्टीच्या पाण्यामध्ये बसून शेतकऱ्यांना दर हेक्टरी ५० हजार रुपये ची मदत झाली पाहिजे यासाठी शासनाला विनंती करण्यात आली. अतिवृष्टीमुळे कामगाराला रोजगार नाही कामगारांना देखील सरकारने त्वरित मदत करावी अशी मागणी शासनाकडे करण्यात आली. त्यासाठी शेतकऱ्यावरती मोठे संकट आले आहे. शेतकरी वाचला पाहिजे शेतकऱ्यांना न्याय भेटला पाहिजे यासाठी पाण्यात बसून मागणी करण्यात आली. यावेळी महादेव सोनकांबळे, परमेश्वर सोनकांबळे, उल्हास बोरगारे, शिवराज नागरसे, पंचशील सोनकांबळे, जे.एन सामाजिक संघटनेचे संस्थापक बाबासाहेब सोनकांबळे, फकीराप्पा व्हणकइ व शेतकरी बांधव उपस्थित होते.





## संपादकीय....

### सर्वसामान्यांना दिलासा

एसटी महामंडळाने १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यात येणार होती. पण या भाडेवाढवरुन सर्वसामान्यांमध्ये नाराजी व्यक्त केली जात होती. जनभावना ओळखून सरकारने हा निर्णय मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानंतर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हंगामी भाडेवाढ मागे घेत असल्याची मोठी घोषणा केली. यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाने महाराष्ट्रातील जनतेला आता नेहमीच्या भाडेनुसार एसटीचा प्रवास करता येणार आहे. यामुळे ऐन दिवाळीत सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. दिवाळी निमित्त १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या काळासाठी एसटीकडून हंगामी भाडेवाढ करण्यात येणार होती. ही भाडेवाढ तब्बल १० टक्के इतकी होती. पण यामुळे राज्यभरात नाराजी व्यक्त केली जात होती. ग्रामीण भागातील जनता ही सर्वाधिकपणे एसटी बसने प्रवास करते. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राला त्याचा फटका बसला असता. याशिवाय एसटी बसने गावी जाणाऱ्या शहरी भागातील नागरिकांनादेखील यामुळे जास्तीचे पैसे मोजावे लागले असते. अखेर सरकारने हंगामी भाडेवाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी दिवाळीला हंगामी भाडेवाढ केली जाते. त्यामुळे यावर्षीदेखील ती करण्यात येणार होती. पण राज्यात सध्या ओला दुष्काळ पडला आहे. अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे. अनेक संसार उद्ध्वस्त झाले आहेत. घरांची पडझड झाली आहे. गावात, घरात पाणी शिरलं आहे. अनेक घरांमध्ये चिखलाचं सम्राराज्य आहे. अशा या संकट काळात महाराष्ट्रातील जनतेला पुन्हा उभं करण्याचं मोठं आव्हान सरकार पुढे आहे. राज्यातील जनता इतक्या अडचणीत असताना एसटीची भाडेवाढ करणं त्यांना परवडणार नाही. यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाडेवाढ मागे घेण्याची सूचना परिवहन विभागाला केली होती. त्यानुसार परिवहन मंत्र्यांनी एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळ दरवर्षी दिवाळीच्या काळात दहा टक्के भाडेवाढ करीत असते. यातून साधारणपणे महामंडळाला ३० कोटी रुपयांचा महसूल मिळतो.

# समतेचा नवा पहाटेचा सूर्योदय : धम्मचक्र प्रवर्तन दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धम्म म्हणजे समतेचा दीप, प्रवर्तन दिन म्हणजे स्वाभिमानाचा उत्सव आणि धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे अन्यायाविरुद्ध बंड, पण हिंसेशिवाय. म्हणजेच, गुलामीतून स्वाभिमानाकडे प्रवास, अन्यायाविरुद्ध बंडाचे प्रतीक आणि समतेच्या नवा समाजव्यवस्थेचे बीजारोपण. १४ ऑक्टोबर १९५६ हा दिवस भारतीय समाजाच्या इतिहासात कायम स्वरूपी सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्वीकारून एका नवा युगाचा प्रारंभ केला आणि शतकानुशतकांची गुलामगिरी, शोषण, जातिभेद यांना छेद देत नवा युगारंभ केला. हा क्षण केवळ धर्मांतराचा नव्हता, तर तो होता मनुष्याला मनुष्य म्हणून जगण्याचा, समतेने श्वास घेण्याचा आणि आत्मसन्मानाने उभं राहण्याचा क्रांतिकारी क्षण. हा दिवस भारतीय इतिहासातील एक क्रांतिकारी वळण आहे. हाच तो क्षण होता ज्याने दलित, शोषित, वंचित समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. त्यामुळे १४ ऑक्टोबर हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नसून, तो आशेचा, स्वाभिमानाचा आणि क्रांतीचा दिवस आहे. धम्मचक्र प्रवर्तनाचा सामाजिक संदेश, ते माणसाला माणसासमान जगण्याची शिकवण देते. बौद्ध धर्म हा स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा अधिष्ठान आहे ज्यात कोणतीही जात नाही, उच्च-नीचपणाचा भेद नाही. त्यामुळे धम्म स्वीकारणे म्हणजे आत्मसन्मान स्वीकारणे.

बाबासाहेबांनी सारनाथच्या धम्म चक्र फिरवणाऱ्या बुद्धांच्या परंपरेशी संगती साधत, आश्विन पौर्णिमेला दीक्षाभूमीवर धर्मचक्र फिरवले. त्या एका कृतीने त्यांनी पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या दास्याच्या साखळ्या तुटल्या आणि समतेच्या धर्माचा नवा प्रवास सुरू झाला. भारताच्या दीर्घ सामाजिक इतिहासात जातिव्यवस्था ही जखम होती. शेकडो वर्षे दलित समाजाला अपमान, अन्याय, अस्पृश्यतेच्या यातना सोसाव्या लागल्या. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अभ्यास, संघर्ष आणि त्यागातून या व्यवस्थेविरुद्ध आवाज उचलला. अखेर त्यांनी ठामपणे जाहीर केले की, मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही आणि आपल्या शब्दाला जागत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन लाखो जनतेला नवजीवन दिले. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे. या दिवशी बाबासाहेबांनी जे धाडस केले, त्यातून दलित समाजाने आपली गुलाम मानसिकता झटकून टाकली, हा दिवस म्हणजे स्वाभिमान दिन आहे. भगवान बुद्धांनी दिलेला धम्म हा कोणत्याही देवधर्माच्या अधीन नसून करुणा, प्रज्ञा आणि मैत्री यांवर आधारलेला आहे. त्यांनी शोषण, अंधश्रद्धा आणि हिंसेला नाकारलं, अत्त दीपो भव हा त्यांचा संदेश मानवाला आत्मबळ देणारा ठरला. जातीपातीच्या अंधाऱ्या विळख्यात अडकलेल्या समाजाला त्यांनी समानतेचा आणि ज्ञानाचा दीप दाखवला. बुद्ध धम्म हा कर्मकांडांचा मार्ग नाही, तर व्यवहाराचा आणि विचारांचा मार्ग आहे. माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवणारा हा जीवनमार्ग आजही तितकाच सुसंगत आणि आवश्यक आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिन केवळ स्मरणोत्सव नसून तो आहे सतत जागवणारा



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

चेतावणीचा नगारा. विषमता, दारिद्र्य, अन्याय अजूनही समाजात आहे, अशा परिस्थितीत आजच्या पिढीसाठी १४ ऑक्टोबरचा संदेश असा आहे की, समता, न्याय आणि करुणा अधिक सामर्थ्याने पसरवण्याची गरज आहे. हा फक्त एका धर्मांतराचा दिवस नाही. तो भारतीय समाजाच्या पुनर्जन्माचा दिवस आहे. ज्यांनी अस्पृश्यतेच्या अंधःकारातून प्रकाशाकडे वाटचाल केली, त्यांचा हा उत्सव आहे. म्हणूनच आपण हा दिवस केवळ साजरा करावा असे नाही, तर जीवनपद्धतीत उतरवावा. तो होता मनुष्यत्वाचा उत्सव, तो होता अस्मितेचा पुनर्जन्म, तो होता न्याय, समता आणि बंधुत्वाच्या नव्या वाटचालीचा आरंभ. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हते, तर मानसिक गुलामीतून मुक्त होण्याचा शपथविधी होता. त्या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र जमलेला जनसागर पाहताना असे वाटले. जणू अंधाराने त्रस्त झालेले लाखो तारे एका सूर्याच्या प्रकाशाने उजळून निघाले. लोकांच्या डोळ्यांत अश्रू होते, पण ते दु:खाचे नव्हते; ते होते आनंदमुक्तीचे अश्रू. शतकानुशतके अपमान सहन केलेल्या समाजाने पहिल्यांदाच उंच मान करून मोकळा श्वास घेतला. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या शिवाय मानवतेला अर्थ नाही. तसेच, हा दिवस आपल्याला शिकवतो की खरी ताकद ही संघटनेत, शिक्षणात आणि विचारांत आहे. बाबासाहेबांनी या दिवशी केवळ धर्मबदल केला नाही, तर त्यांनी समाजबदलाचा पाया घातला. त्यांनी दाखवलेला मार्ग हा विज्ञाननिष्ठ, तार्किक आणि मानवी अस्मिता जपणारा होता. आज, जेव्हा समाजात अजूनही असमानता, द्वेष आणि भेदभावाचे काटे टोचतात, तेव्हा धम्मचक्र प्रवर्तन दिन आपल्याला पुन्हा पुन्हा जागं करतो. त्याकरिता आपण बुद्धधम्माचे वारसदार म्हणून करुणा आणि मैत्रीची बीजे रुजवली पाहिजेत. जात, धर्म, पंथ यांच्या भिंती मोडून प्रबुद्ध समाज निर्माण केला पाहिजे आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणे, हीच खरी बाबासाहेबांना आणि बुद्धांना खरी वंदना ठरते.

नागपूरची भूमी, लाखोंचा सागर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तेजोमय संकल्प! तो फक्त एक दिवस नव्हता; तो पिढ्यान् पिढ्यांच्या अश्रूंचा शेवट आणि मानवतेच्या नव्या पहाटेचा उदय होता. या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र आलेल्या जनसमुदायाची अवस्था डोळ्यांसमोर आणली, तर अंगावर शहारे येतात. शतकानुशतकांच्या अन्यायाचे ओझे त्या दिवशी हलके झाले. आता आपणही माणूस आहोत, समान हक्काचे आहोत ही भावना आणि भावनिक दृष्टीकोन त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती. तो केवळ धर्मांतर नव्हता; ती मानवी स्वातंत्र्याची घोषणा होती. आज आपल्याला १४ ऑक्टोबरचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. कारण जातिव्यवस्था आजही वेगवेगळ्या स्वरूपात दिसते. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ उत्सव नाही, तर तो आहे आपल्या अस्तित्वाची आेळख. हा दिवस आपल्याला सांगतो, भूतकाळातील बेड्या आपण तोडल्या आहेत, आता भविष्याच्या प्रगतीचे दार आपण स्वतः उघडायचे आहे. म्हणूनच या दिवशी आपण सर्वांनी करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या मार्गावर चालत प्रबुद्ध भारत घडवण्याची प्रतिज्ञा करूया. १४ ऑक्टोबरच्या त्या ऐतिहासिक दिवशी सुरू झालेल्या प्रबुद्धतेच्या प्रवासाला आजही नवी ऊर्जा मिळो. सर्वांना ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या मंगलमय शुभेच्छा !

# नवरात्र महोत्सव: श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक पसरती बैठक पोशाख अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे खंडेमहानवमी विजयादशमी दसरा दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस पसरती बैठक पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिति मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.



श्री विठ्ठलास नक्षी टोप, प्रभावळ सह, बालाजी नाम, कौस्तुभ मणी, हिऱ्याचा कंगण जोड, मस्त्य जोड, तोडे जोड, तुळशीची माळ १ पदरी, अष्टपैलू मण्याची कंठी ३ पदरी पदकासह, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, जवेची माळ २ पदरी, झनक झनक हार, एकदाणी, तंदळया हार ७ पदरी, लक्ष्मीहार, दंड्पेठ्या जोड मोठ्ठा. इ. अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच ✻रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, मान्यमोत्याच्या पाटल्या जोड, सोन्यामोत्याचे तानवड जोड, मोठी नथ, वाळ्या जोड, चिंचपेटी हिरवी, मोत्याचे मंगळसूत्र, पवळ्याचा हार, खड्याची बिंदी, कोल्हापुरी साज, पुतळ्यांच्या माळा, पैंजण जोड, सरी, तुळशीची माल १ पदरी, ठुशी इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस सिध्देश्वर टोप, लक्ष्मीहार, जवमनी पदक, जवेची माळ व ✻सत्यभामादेवीला लक्ष्मी टोप, हायकोल, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, चिंचपेटी तांबडी, इत्यादी अलंकार व प्रथा परंपरेप्रमाणे पोशाख परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आलेले आहेत.

तसेच दि. ०२ ऑक्टोंबर रोजी रिध्दी - सिध्दी गणपती मंदिरात विजया दशमी दसरा निम्मित दरवर्षीप्रमाणे सिमोल्लंघन साजरे करण्यात येत आहे, तसेच त्या ठिकाणी देखील आवश्यक त्या सोई सुविधा पुरविण्यात येत आहेत.

दि. ०३ ऑक्टोंबर रोजी एकादशी असल्याने भाविकांची मोठी प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने दर्शनरांगेत सुरक्षा रक्षक नियुक्ती, पाणी व चहा वाटप, बॅरीकेटींगची व्यवस्था विद्युत व्यवस्था इतर अनुषंगीक सोई सुविधा पुरेसा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# रेशनचा धान्याचा काळाबाजार; शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी सहा ट्रक पकडून केली पोल खोल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरात शासकीय धान्याचा काळाबाजार सुरू असताना शिवसेना शिंदे गटाचे नेते साईनाथ बडवे यांनी दहा टाकले आहे, कराड रोडवरील सिंहगड परीक्षा जवळच्या मोकळ्या मैदानात रेशनचे धान्य वितरण करणाऱ्या सहा ट्रक उभ्या होत्या. या ट्रक मधून खाजगी पिकप मध्ये रेशनचा गहू आणि तांदूळ भरला जात होता. शासकीय गोदामातून शासकीय गाडीमध्ये भरूनच रेशन दुकानापर्यंत पोहोचवले जाते. मात्र काळाबाजार करण्याच्या हेतूने शहराच्या बाहेर निर्जन ठिकाणी रेशन त्यांनी खाजगी गाडीत भरले जात होते सदरची घटना उघडकीस आल्यानंतर पंढरपूरचे नायब तहसीलदार बालाजी आपल्या पथकासह दाखल झाले. पंढरपूर शहर आणि पंढरपूर ग्रामीण पोलीस देखील या ठिकाणी तात्काळ हजर झाले व सदरच्या प्रकरणाची कसून चौकशी सुरू आहे.

**गोदामाच्या बाहेर धान्याचे वितरण करणे हे बेकायदेशीर**

यावर नायब तशिलदार तथा पुरवठा अधिकारी बालाजी पुलदवाड यांनी शासकीय गोदामाच्या बाहेर धान्याचे वितरण करणे बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट केले आहे. पंढरपूर पासून जवळ कोर्टी हद्दीमध्ये शासकीय धान्य खाजगी वाहनातून भरून इतरत्र नेले जात असताना शिवसेनेचे शहर उपप्रमुख साईनाथ बडवे यांनी पकडले आहे.त्यानंतर पुरवठा विभाग आणि पोलिसांनी खाजगी वाहना दोन शासकीय धान्याचे ट्रक ताब्यात घेतले आहेत प्रथम दर्शनी धान्याचा काळाबाजार झाल्याचा अंदाज आहे.

# पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सभा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक संवर्धन सभा शुक्रवार दिनांक २६/९/२०२५ रोजी दुपारी दोन वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री हरीश दादा भास्कर गायकवाड साहेब यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्ह्याचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक साहेब, चेअरमन कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सह. कारखाना लिमिटेड श्रीपुर, यांच्या प्रमुख उपस्थितीत बाजार समितीच्या सभागृहामध्ये संपन्न झाली.




यावेळी कर्मयोगी स्वरबंद परिचारक पांडुरंग सह. साखर कारखान्याची चेअरमन मा..आ. प्रशांतराव परिचारक म्हणाले की बाजार समितीच्या माजी व सध्याचे सभापती यांनी चांगले प्रयत्न केल्यामुळे बाजार समितीचा कारभार चांगल्या पद्धतीने सुरू असून उत्कृष्ट वाटचाल सुरू आहे मोठ्या मालकाच्या दूरदृष्टी प्रमाणे आज या बाजार समितीमध्ये ५५६ कोटीची उराडाल झालेली आहे. मुळातच बाजार समितीची स्थापना ही शेतकरी बांधवांना न्याय मिळावा हेतूने झालेले आहे. तसेच बाजार समितीने यावर्षी बाजार आवारात जास्तीत जास्त शेतीमाल विक्री केल्याबद्दल शेतकरी यांचा सन्मान व जास्तीत जास्त शेतीमालाच्या विक्रीची उलाढाल करणारे व्यापारी यांचाही सन्मान केल्याबद्दल शुभेच्छा देऊन बाजार समितीचे कामकाजाबाबत कौतुक केले तसेच शेतकऱ्यांना सोयीसाठी नवीन काही करता येईल का ते पहावे बाजार समितीमार्फत व्यापार वाढीसाठी भविष्यात आणखी आणखीन सोई सुविधा पुरवल्या जातील असे सांगितले. यावेळी सभेचे अध्यक्ष बाजार समितीचे सभापती मा. श्री हरीश दादा गायकवाड यांनी प्रास्ताविक मध्ये बाजार समितीच्या कामकाजाबाबत सांगताना म्हणाले की मा.आ. प्रशांतराव परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीचे वाटचाल चालू असून. वरचेवर बाजार समितीच्या उत्पन्नामध्ये वाढ झालेली आहे बाजार समितीमध्ये बेदाणा शेतीमालाची सण रुपये ४०४ कुटी, व डाळिंब रुपये ७० कोटी फळे व भाजीपाला रुपये ३७ कोटी, भुसावळ धान्य रुपये १७ कोटी कांदा रुपये १५ कोटी, जानेवारी रुपये पाच कोटी केळी रुपये सात कोटी व एरंड रुपये एक कोटी अशी एकूण बाजार समितीची वार्षिक उलाढाल पाच छप्पन कोटी झालेले आहे या उलाढारी मधून रुपये ४.८९ कोटी उत्पन्न बाजार समितीला मिळाले आहे. समितीने शॉपिंग सेंटर गाळे वाढदिवस सौदे कामकाज करिता सेल हॉल स्वच्छतागृहाची सोय पिण्याच्या पाण्यासाठी आर. ओ. प्लांट. बाजार आवारात वॉल कंपाऊंड ६ मॅट्रिक टनी वजन काटा इत्यादी विविध विकास कामे केलेली असून बाजार समिती आवारात सीसीटीव्ही ही यंत्रणा बसवणे फळे व भाजीपाला मार्केट साठीचे गाळे व डाळिंब मार्केट करिता क्वांटिटीकरण करणे कर्मयोगी स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक मालक यांच्या पुतळा उभारणी करणे व सौर ऊर्जा प्रकल्प रस्ते शॉपिंग सेंटरचे वरील मजल्याचे बांधकाम शेतकरी भवन पेट्रोल पंप इत्यादी कामे व इतर सोयी सुविधा करण्याचा आमचा मानस आहे तसेच महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समिती महामंडळाच्या शेतीमाल तारण कर्ज योजना संबंधित आहोत सन २०२४/२०२५ या उत्कृष्ट बाजार समितीला वसंत दादा पाटील स्मृती पुरस्कार या बाजार समितीला मिळाला तसेच स्मार्ट प्रकल्प अंतर्गत बाजार समितीमध्ये विविध सुविधा वैज्ञानिक कामकाज व आर्थिक कामकाजाच्या आधारे दिलेल्या गुणांकानुसार या बाजार समितीचा राज्यस्तरीय पाचवा क्रमांक विभागून व दुसरा क्रमांक जिल्ह्यातून व पहिला क्रमांक मिळालेला आहे. बाजार समितीच्या आवारामध्ये फळे डाळिंब भाजीपाला कांदा भुसार म✻✻ व इत्यादी सौदी कामकाज चांगल्या प्रकारे चालू असून बाजार समितीकडून बँकेमध्ये गुंतवणूक मध्ये वाढ झालेली आहे. तसेच आवश्यक विकास कामे पूर्ण करून व्यापार वाढीसाठी प्रयत्न करीत आहोत असे सांगितले.

मान्यवरांचे सुरुवातीला बाजार समितीचे उपसभापती मा श्री राजू बापू विठ्ठलराव गावडे साहेब यांनी सर्वांचे स्वागत केले.

बाजार समितीचे सुरू असलेल्या उपक्रमातून बाजार आवारात जास्तीत जास्त शेतीमाल विक्री केल्याबद्दल शेतकरी श्री प्रशांत भारत पाच फुले राहणार यमलवाडी तालुका मोहोळ श्री संदीप मच्छिंद्र जाधव राहणार जाधव वाडी तालुका पंढरपूर व श्री दिगंबर रामचंद्र घाटोळे करकम तालुका पंढरपूर श्री उद्धव पंढरीनाथ बागल तालुका पंढरपूर, श्री गणेश गंगाराम सातपुते राहणार पाटकुल तालुका मोहोळ, श्री तानाजी शामराव अनुसे राहणार उंबरे तालुका माळशिरस, श्री भारत जगन्नाथ झांबरे राहणार पळशी तालुका पंढरपूर, श्री वैजनाथ बांदा लोखंडे राहणार आहेरगाव तालुका माढा, श्री संकेत संजय बागल राहणार जळोली तालुका पंढरपूर, श्री रेवन्नाथ भुजंगराव पाटील राहणार पंढरपूर, योगेश अशोक दांडगे राहणार रांजणी तालुका पंढरपूर, श्री संग्राम दिलीप एकतपुरे राहणार माळशिरस तालुका माळशिरस श्री रामचंद्र महादेव शिंदे राहणार शेंडेचीव तालुका माळ श्री शंकर त्रिंबक पाटील गुरसाळे तालुका पंढरपूर, बेदाणा असोसिएशनचे पंढरपूर तालुका अध्यक्ष श्री सोमनाथ डोंबे, मा श्री प्रकाश कुलकर्णी, सहकारी तुलसी ट्रेडिंग कंपनी श्री बाफना, श्रीहरी ट्रेडिंग कंपनी मुकुंद मर्दा, असिस्ट ट्रेडिंग कंपनी श्री पांडुरंग खरात, बालाजी फूड सेल प्रोप सचिन बबन गंगथडे, श्री विठ्ठल ट्रेडिंग कंपनी राहुल सुभाष देवकर, पेरणा ट्रेडिंग कंपनी, प्रदीप बागल, राजकुमार दीपचंद फळे श्री अनिल कुमार दीपचंद फडे सुनील दत्तात्रेय भिंगे तसेच जास्त बेदाणा खरेदी केल्याबद्दल खरीदार मेसर श्री कन्हैया ट्रेडिंग कंपनी प्रो मनोज मालू यांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी बेदाणा असोसिएशनचे अध्यक्ष संचालक मा श्री सोमनाथ डोंबे यांनी आपले मनोगत व्यक्त केले श्रद्धांजलीचा पुरावा बाजार समितीचे संचालक श्री वसंत चंदनशिवे यांनी मांडला विषय वाचन अहवाल वाचन सचिव कुमार घोडके यांनी केले व बाजार समितीचे सन २०२४-२५ चे वार्षिका ते एकूण उत्पन्न ४८९,३३,३९२/झाले असून एकूण खर्च ३.१४,६०,१०३/ इतका वजा जाता सरप्लस/आढावा १,७४,७३,३८९/इतका झालेला आहे बाजार समितीचे वार्षिक आढावा ५५६ कोटी रुपये झालेला आहे.

शेवटी उपसभापती मा श्री राजीव गावडे यांनी सर्वांचे आभार मानले व सदर कार्यक्रमाची सूत्रसंचालन सह सचिव श्री राजेंद्र जोशी यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कार्तिकी यात्रा; अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करावी : प्रांताधिकारी सचिन इथापे

## वारी कालावधीत वारकरी, भाविकांच्या सोयी सुविधांना प्राधान्य




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे ८ ते १० लाख भाविक येतात. अतिवृष्टीमुळे शहरातील व शहरात येणाऱ्या रस्त्यांवर खड्डे पडल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहेत. येणाऱ्या वारकरी भाविकांना तसेच नागरिकांना वाहतुकीबाबतची समस्या निर्माण होऊ नये यासाठी पंढरपूर नगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ रस्त्यांच्या दुरुस्तीचे कामे करावीत अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत प्रांताधिकारी कार्यालय, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, तहसिलदार सचिन लंगुटे, मदन जाधव, कार्यकारी अभियंता अमित निमकर, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.धोत्रे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, नायब तहसिलदार बालाजी पुलवाढ, वैभव बुचके, मंदीर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत तसेच संबधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. ०२ नोव्हेंबर, २०२५ रोजी असून, यात्रा कालावधी दि.२२ ऑक्टो. ते ०५ नोव्हें. असा राहणार आहे. या यात्रा कालावधीत वारकरी, भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी योग्य नियोजन करावे, यात्रा कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा, चंद्रभागा वाळवंटात स्वच्छता व पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे, धोकादायक इमारतींवर ठळक सूचना फलक लावावेत. शहरातील अतिक्रमणे काढण्याबाबत नगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्त पथकाची नेमणूक करावी. वाहनतळाची स्वच्छता व पुरेशा प्रकाशाची व्यवस्था करावी.राष्ट्रीय महामार्ग अन्न औषध प्रशासन विभागाने खाद्य पदार्थ तसेच प्रसादाच्या दुकानाची वेळोवेळी तपासणी करावी.

आरोग्य विभागाने तज्ञ डॉक्टर,फिरते वैद्यकीय पथक, मुबलक औषधसाठा उपलब्ध राहील याबाबत नियोजन करावे. मंदिर समितीने दर्शन रांगेत ठिकठिकाणी सूचना फलक लावावेत. दर्शनरांगेत घुसखोरी होणार नाही याची दक्षता घ्यावी . राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने वाखरी ते पंढरपूर रस्त्यांची अपूर्ण काम तात्काळ पुर्ण करावीत. जलसंपदा विभागाने चंद्रभागा नदीपात्रातील पाण्याची पातळी लक्षात घेवून भाविकांच्या सुरक्षेसाठी होडी वाहतुकी नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्यात. कार्तिकी यात्रा कालावधीत जनावरांचा बाजार मोठ्या प्रमाणात भरत असल्याने जनावरांना व पशुपालकांना सोयी सुविधा उपलब्ध कराव्यात. भक्ती सागर (६५ एकर) येथील जागेची स्वच्छता करुन वीज, पाणी आदी व्यवस्थेची उपलब्धता करावी अशा सूचनाही प्रांताधिकारी श्री इथापे यांनी यावेळी दिल्या.

# श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या नित्य उपचारासाठी शुद्ध सात्विक जलाचा वापर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या मूर्तींवर दररोज करण्यात येणारे नित्योपचार (राजोपचार) हे प्रथा व परंपरेनुसार काटेकोरपणे पार पाडले जातात. मूर्तींचे संवर्धन व दीर्घकाळ संरक्षण व्हावे या दृष्टीने पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार व आदेशानुसार उपचारावेळी शुद्ध सात्विक जलाचा वापर केला जात असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

अभिषेकावेळी केवळ सात्विक जलाचा नाही तर श्री विठ्ठलावर नितांत श्रद्धा असणारे भाविक सेवाभावी तत्त्वावर जे गंगाजल अर्पण करतात, त्याचाही समावेश करण्यात येतो. याशिवाय, ग्रहणकाळात – म्हणजे ग्रहण लागलेले आणि सुटलेले स्नान घालताना – अनेक वर्षापासून चालत आलेल्या परंपरेनुसार चंद्रभागेचे जल वापरले जाते.

कोविड- १९ महामारीच्या काळातसुद्धा मंदिर समितीने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या राजोपचारांमध्ये कोणताही खंड पडू दिला नाही अथवा बदल केला नाही. भाविकांना मंदिरात प्रत्यक्ष प्रवेश नव्हता, तरीदेखील श्रींचे नित्योपचार, पूजा-अर्चा आणि पारंपरिक विधी अखंडितपणे सुरू ठेवले होते.

श्रीच्या राजोपचारात कोणताही बदल अथवा खंड करण्यात आलेला नाही, सर्व प्रथा व परंपरा कायम ठेवूनच हे उपचार पार पाडले जातात. मूर्तींचे रक्षण तसेच प्रथा व परंपरा हे दोन्ही घटक जपण्याची जबाबदारी मंदिर समिती जबाबदारीने पार पाडत आहे.

श्रींच्या नित्योपचारात परंपरेला कुठेही धक्का लागू दिला जात नाही. पुरातत्त्व विभागाच्या सूचनेनुसार शुद्ध सात्विक जल वापरले जाते, परंतु त्यामध्ये गंगाजलाचा समावेश असतो. ग्रहणकाळात मात्र शास्त्रोक्त परंपरेनुसार चंद्रभागेचे पाणीच श्रींना स्नानासाठी अर्पण केले जाते. हजारो वर्षांची प्रथापरंपरा आणि श्रींच्या मूर्तीची संरक्षणाची गरज या दोन्हींचा समतोल साधत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती राजोपचाराची परंपरा जपत असल्याचे यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या मदतीसाठी मुख्याध्यापक महंतेश्वर कट्टीमनी यांनी दिला महिन्याचा पगार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या मदतीसाठी मुख्याध्यापक महंतेश्वर कट्टीमनी दिले एक महिन्याचे पगार जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांच्याकडे दिले धनादेश सुपूर्द केले

महाराष्ट्रात झालेले अतिवृष्टीमुळे पूर्ण शेतकऱ्यांचे पिक नाश होऊन वाहून गेलेले आहे, काही शेतकरी आत्महत्या सुद्धा केलेल्या आहेत काही शेतकऱ्यांचे घरातील अन्नधान्य वाहून गेलेले आहेत आणि विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य पुरात वाहून गेले आहे कहीं लोग बेघर झाले.

असे अनेक अडचणी महाराष्ट्रातील व देशातील शेतकऱ्यासमोर मोठा संकट उभा आहे त्या संकटाला तोंड देण्यासाठी आपल्या देशातील अनेक संस्था पुढे सरसवलेले आहे आणि महाराष्ट्र शासन सुद्धा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत युद्ध पातळीवर करत आहे काही शेतकऱ्यांना होडीतून काही शेतकऱ्यांना हेलिकॉप्टर वरून सुरक्षित स्थळी पाठवले आहे.

शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी महाराष्ट्रातील शिक्षक सुद्धा एक दिवसाचे पगार देण्याचे जाहीर केले आहे आणि तसेच सोलापूर जिल्ह्यातील शिक्षक सहकारी पतसंस्था सुद्धा मदत केले आहे.

मागासवर्गीय शिक्षक संघटना अक्कलकोट अध्यक्ष महंतेश्वर कट्टीमनी यांनी एका महिन्याचे वेतन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे शेतकऱ्यांचा मदत साठी व विद्यार्थ्यांसाठी धनादेश द्वारे सुपूर्द केले आहे यावेळी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष शामराव जवंजाळ उपस्थित होते.

# ऋतुजा धुमाळी हिने मिळवलेले सुवर्णपदक राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन १०० मीटर पेस्टल शूटिंग स्पर्धेत पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी ऋतुजा धुमाळ हिने चमकदार कामगिरी करून सुवर्णपदक पटकावले. या उल्लेखनीय यशामुळे तिची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर बी. एस .बलवंत. यांनी अभिनंदन केले, वाणिज्य विभाग प्रमुख गजधाने, क्रीडा शिक्षक अनिल परमार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले,

कुमारी ऋतुजा धुमाळी च्या या यशाबद्दल महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. व तिच्याबद्दल विविध सरासून तिच्यावर अभिनंदन आता वर्षाव होत आहे.

# इंडियन मॉडेल स्कूलचे शालेय हॉकी स्पर्धेत यश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा हॉकी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शालेय हॉकी स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांनी गटांचे विठ्ठलराव शिंदे प्रशाला अंबाडा या संघाला ३-० पराभव केला व अंतिम सामन्यात विश्व अक्ॅडमी अक्कलकोट या संघाला १-० पराभव करत अक्कलकोट येथील इंडियन मॉडेल स्कूलने स्पर्धांचे विजेतेपद पटकावले.

विजयी संघ -संबोध सोनकांबळे ( कर्णधार), अनुप बिराजदार, अयान बागमारु, अजिंक्य बट्टेगिरी, गणेश चेडके, प्रथम हंचाटे, रोहन कत्ते, समर्थ गीरी, करबसप्पा कोनापुरे, अजिंक्य सुतार, पियुष पाटील, भारतकुमार बिराजदार, सोहम हुबळीकर, अर्जुन निकम, अनुराग दसाडे, सुमित दासरे, अनिश लंगोट, विश्वराज मुदगुडी, संभव भराटे.

या विजयी संघाला क्रीडा शिक्षक दयानंद दणूरे, राज्य हॉकी मार्गदर्शक जरार कुरेशी, हॉकी प्रशिक्षक आवेज होटगी यांचे मार्गदर्शन लाभले. या विजयी संघाला शाळेचे संस्थापक अध्यक्ष माजी ग्रहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी, सायली जोशी, संस्थेचे सचिवा शीतल म्हेत्रे, ममता बसवंती, शाळेच्या मुख्याध्यापिका गौरी दातार, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणपती वाघमोडे यांनी अभिनंदन केले

## धनगर आरक्षण कृती समितीच्या अंदोलन प्रसंगी कार्यकर्त्यांची डरकाळी

# धनगर समाजाला एस टी प्रवर्गात समावेश करा अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : सरकारने धनगर समाजाला तात्काळ एसटीचे आरक्षण द्यावे अन्यथा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत सरकारला याचे गंभीर परीणाम भोगावे लागतील असा कनखर इशारा धनगर आरक्षण कृती समितीचे राम जवान सह कार्यकर्त्यांनी धनगर आरक्षण कृती समितीच्या वतीने इटकळ ता. तुळजापुर येथे राष्ट्रीय महामार्गावर आयोजित केलेल्या रास्ता रोको आंदोलन प्रसंगी देण्यात आला

धनगर समाजाला तात्काळ एस टी चे आरक्षण द्यावे या मागणीसाठी दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० वा. धनगर आरक्षण कृती समितीच्या वतीने इटकळ ता. तुळजापुर येथे राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात तालुक्यातील धनगर समाज मेंढरासह मोठया संख्येने सहभागी झाला होता. यावेळी धनगर समाज बांधवांनी डोक्यावर पिवळी टोपी परीधान केल्याने महामार्गावर पिवळे वादळ आल्याचा भास निर्माण झाला होता. हा रास्ता रोको एक तासापेक्षा जास्त वेळ चालल्याने महामार्गाच्या दोन्ही बाजुला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.यावेळी महामार्गारून रुग्णवाहीका जात असतांना आंदोलन कर्त्यांनी रुग्णवाहिकेला जाण्यासाठी रस्ता मोकळा करुन दिला.

या आंदोलनात तालुक्यातील धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. सर्व पक्षाचे पदाधिकारी केवळ धनगर समाजासाठी पक्षाचे जोडे बाजुला ठेऊन या आंदोलनात सहभागी झाले होते.

यावेळी माजी जि. प. सदस्य गणेश सोनटक्के, दीपक घोडके, अरविंद घोडके, ड. आशिष सोनटक्के, सोमनाथ गुड्डे, ज्ञानेश्वर घोडके, बाळकृष्ण घोडके पाटील, निखिल घोडके, संजय घोडके, दादा भोपळे, अनिल बंडगर,अरविंद पाटील यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सरकारवर सडकुण टीका केली. सरकारने तात्काळ धनगर समाजाला एसटीचे आरक्षण द्यावे अन्यथा धनगर समाज राज्यातील सरकार उलथवुन टाकेल असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

यावेळी बोलतांना राम जवान यांनी सर्वच राजकीय पक्षांनी आजपर्यंत धनगर समाजाचा विश्वासघात केला आहे. फक्त निवणुकी पुरते धनगर समाजाचा वापर करुन घेण्याचे काम राजकीय पक्षांनी केले आहे. मात्र आज ती परीस्थिती राहिली नाही आज आरक्षणाच्या मागणीसाठी धनगर समाज पेटुन उठला आहे. त्यामुळे सरकारने आता तात्काळ धनगर समाजाला एसटीचे आरक्षण द्यावे अन्यथा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत धनगर समाज सरकारला त्याची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही असे म्हटले आहे.

या आंदोलनात अप्पासाहेब पाटील, विजय श्रीनामे,सचिन घोडके, ज्ञानेश्वर घोडके, गजानन हळदे,शहाजी हाके, दयानंद चौरे, पद्माकर घोडके, शंकर पाटील, सुहास येडगे, विलास येडगे, अमर भाळे यांच्यासह संपुर्ण तालुक्यातुन धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे या आंदोलनात सहभागी झाला होता.यावेळी आंदोलनस्थळी मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# निफाड नगरपंचायत द्वारा स्वच्छता कर्मचारी यांचे आरोग्य शिबीर संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत मार्फत स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येत असून. दि १७ सप्टेंबर २०२५ ते दि.०२ ऑक्टोबर २०२५ दरम्यान स्वच्छता ही सेवा (SHS) हे अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहे. या अभियानांत स्वच्छता मोहिम राबविणे तसेच स्वच्छता कर्मचारी यांचा सन्मान करणे व आरोग्य शिबीर द्वारे आरोग्यची तपासणी करणे अपेक्षित आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे दि.०२ ऑक्टोंबर या जयंती दिनाचे पार्श्वभूमीवर स्वच्छता पंधरवडा स्वच्छता हीच सेवा या उपक्रम अंतर्गत मुख्याधिकारी धीरज भामरे यांचे मार्गदर्शनाखाली स्वच्छता कर्मचारी यांचे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. पिंपळगाव बसवंत रोड या ठिकाणी स्वच्छता कर्मचारी यांचे आज दि.०१/१०/२०२५ रोजी आरोग्य शिबीर घेण्यात आले. यामध्ये कर्मचारी यांचे शुगर, रक्तदाब, हिमोग्लोबीन व इतर आवश्यक टेस्ट करण्यात आल्या. तसेच उपलब्ध औषधी देण्यात आले. आपला दवाखाना मार्फत वैद्यकीय अधिकारी डॉ. जयेश निकुब यांनी कर्मचारी यांची तपासणी केली यावेळेस नगरपंचायत अधिकारी, कर्मचारी उपस्तीत होते.

# धाराशिव पूरस्थिती; एकही बाधित मदतीपासून वंचित राहणार नाही

## पंचनामे ५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करणार; जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची ग्वाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : जिल्ह्यात २१ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीत कोणताही बाधित शेतकरी किंवा नागरिक मदतीपासून वंचित राहणार नाही, याची संपूर्ण दक्षता घेतली जाईल. नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू असून पारदर्शक पद्धतीने मदतकार्य राबवले जात आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

या महापुरामुळे जिल्ह्यात मोठी हानी झाली असून आतापर्यंत ८ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, तसेच अनेक पाळीव जनावरांचाही बळी गेला आहे. शेती आणि सार्वजनिक मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर आणि अपर




जिल्हाधिकारी ज्योती पाटील उपस्थित होते.

**पंचनामे ५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करणार**

जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की, नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू असून ते ५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पुराच्या पाण्याने बाधित झालेल्या ३,१४९ कुटुंबांना प्रत्येकी १० हजार रुपयांची तातडीची मदत त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. नुकसानीची अचूक माहिती मिळवण्यासाठी तुळजापूर येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेकडून (TISS) सर्वेक्षण केले जात असून, त्यांचा अहवाल मिळाल्यानंतर नुकसानीचा नेमका आकडा स्पष्ट होईल. तसेच, जुलै-ऑगस्ट २०२५ मधील पीक नुकसानीपोटी शासनाकडून प्राप्त झालेले १८९ कोटी रुपये देखील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहेत.

**आरोग्य आणि पुनर्वसन उपाययोजना**

पूर ओसरल्यानंतर रोगराई पसरू नये यासाठी आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी सांगितले. बाधित गावांमध्ये आरोग्य पथकांद्वारे दैनंदिन तपासणी केली जात असून, दूषित झालेले पाण्याचे स्रोत निर्जंतुक करण्याचे काम सुरू आहे. २ ऑक्टोबर रोजी प्रत्येक गावात ग्रामसभेतून विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार आहे.

**भविष्यकालीन नियोजन आणि आवाहन**

भविष्यात अशा आपत्कालीन परिस्थितीत कमीत कमी नुकसान व्हावे यासाठी उपाययोजना केल्या जातील, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दळणवळण ठप्प होण्यास कारणीभूत ठरलेल्या लहान पुलांची उंची वाढवण्याचा प्रस्ताव मंजूर केला जाईल. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी कंपन्या आणि बँकांच्या सीएसआर निधीतून मदत मिळवण्यासाठी लवकरच 'सीएसआर कॉन्फरन्स' आयोजित केली जाईल व कंपन्यांना गावे दत्तक घेण्याचे आवाहन करण्यात येईल.

या कठीण काळात शेतकऱ्यांनी निराश न होता आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलू नये, शासन व प्रशासन आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे, असा विश्वास जिल्हाधिकारी पुजार यांनी व्यक्त केला. तसेच, सेवाभावी संस्थांनी मदतकार्य करताना थेट गावात न जाता तालुका प्रशासनाशी समन्वय साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.




## नवरात्र महोत्सव – नववी माळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : घटस्थापनेपासून सुरू झालेल्या नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने आज नवव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोशाखासह अलंकार परिधान करण्यात आले. या प्रथा-परंपरेनुसार दरवर्षी विशेष अलंकार सोहळा पार पडतो. आज रुक्मिणी मातेस श्री दुर्गा देवीमाता पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक श्री. पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

**( श्री विठ्ठल अलंकार :**

सोन्याची पगडी, नाम निळाच, कौस्तुभ मणी, दंड पेट्या जोड, हिऱ्याचा कंगण जोड, मोत्याचा तुरा, शिरपेच, तोडे जोड, सोन्याचे पितांबर, मस्त्य जोड, मोत्याच्या कंठ्या (२ पदरी व १ पदरी), पाचूचा लोलक, बाजीराव कंठी, तुळशीची माल १ पदरी आदी अलंकार परिधान करण्यात आले.

**( रुक्मिणी माता अलंकार :**

जडवाचे मुकुट, खड्यांच्या पाटल्या जोड, कर्णफुले जोड, मोठी नथ, सूर्य-चंद्र, जडावाचा तानवड जोड, हातसर जोड, चिंचपेटी हिरवी, मोत्याचा कंठा, मासपट्टा, पेट्याची बिंदी, बाजीराव गरसोळी, मोत्याचे मंगळसूत्र, मोत्याची बिंदी, मोत्याचा तुरा, पैंजण जोड, रूळ जोड, मस्त्य जोड, सोन्याचा करंडा, तोडे जोड, बाजूबंद जोड, जडावाचा हार, नवरत्नांचा हार, खड्याची वेणी, पाचूची गरसोळी, तन्मणी, शिंदे हार, छत्रछामर इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले.

**( इतर देवी अलंकार :**

राधिका माता - नक्षी मुकुट, चिंचपेटी तांबडी, हायकोल, पुतळ्यांची माळ, जवेची माळ.

सत्यभामा देवी - सिध्देश्वर टोप, मोहरांची माळ, जवेची माळ, जवमानी पदक, लक्ष्मीहार.

याशिवाय मंदिर समितीच्या अखत्यारितील पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता या परिवार देवतांनाही पारंपारिक पोशाख परिधान करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी : ६ ऑक्टोबरला भव्य मोर्चा : ॲड. रोशन पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला राष्ट्रीय लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी रोहा-पेण तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांची भव्य मोर्चाची तयारी सुरु झाली आहे. हा नवी मुंबई विमानतळ धडक मोर्चा ! सोमवार दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ : सकाळी १० वाजता करावे - गणपत शेठ तांडेल मैदान ते नवी मुंबई विमानतळ रेती बंदर गेट येथे लाखोंच्या संख्येने काढण्यात येणार असून, त्यासाठी मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू असल्याचे दिसून आले. शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्यचे प्रदेशाध्यक्ष ड. रोशन पाटील यांनी नागोठणे येथे आयोजित बैठकीत या आंदोलनाची घोषणा केली. ते म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील साहेब यांचे नाव देण्यात यावे, ही स्थानिकांची दीर्घकाळाची मागणी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून याकरिता संघर्ष सुरू आहे. परंतु केंद्र सरकारकडून अद्याप कोणताही सकारात्मक निर्णय झालेला नाही. उलट विमानतळाच्या उद्घाटनाची तयारी वेगाने सुरू आहे. त्यामुळे भूमिपुत्रांच्या भावनांचा सन्मान करण्यासाठी प्रथम नाव निश्चित करावे आणि त्यानंतरच विमानतळाचे उद्घाटन व्हावे, ही आमची ठाम मागणी आहे.

या मोर्चामध्ये रोहा व पेण तालुक्यातील विविध सामाजिक संस्था, संघटना, तसेच हजारो नागरिक सहभागी होणार आहेत. लोकनेते दि.बा. पाटील यांच्या स्मरणार्थ हा मोर्चा ऐतिहासिक ठरणार असून, जनतेच्या भावना सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ॲड. रोशन पाटील यांनी केले आहे.

## ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी सोनाली मोहन पवार यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपरी चिंचवड : मानवाधिकार व सामाजिक विकास या क्षेत्रात संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यरत असलेल्या ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशन या संस्थेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पदी मा. सोनाली मोहन पवार यांची निवड करण्यात आली आहे.

ही निवड संस्थेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मा. कैलास गहिनीनाथ बनसोडे यांच्या हस्ते जाहीर करण्यात आली. पवार यांच्या कार्यकुशलतेचा, सामाजिक भानाचा आणि समाजकार्याच्या अनुभवाचा योग्य सन्मान म्हणून त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

या निवडीबद्दल संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध मान्यवरांनी पवार यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या ३५वा गळीत हंगाम बॉयलर अग्नी प्रदीपण समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५ /२६ या गळीत हंगामाचे ३५ वा बॉयलर अग्नी प्रदीपन समारंभ कारखान्याचे चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक यांच्या शुभहस्ते आज रोजी कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

यावेळी कारखान्याचे संचालक मा श्री भगवान भीमराव चौगुले व त्यांच्या पत्नी सौ वैशालीताई भगवान चौगुले यांच्या शुभहस्ते श्री सत्यनारायण महापूजा संपन्न झाली.

यावेळी कारखान्याची चेअरमन श्री प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले की गळीत हंगाम २०२५ २६ /साठी कारखान्याकडे सुमारे १२ लाख मीटरच्या ऊस नोंद्या असून या सर्व उसाची गाळप वेळेत करण्याचे नियोजन व्यवस्थापनाकडे केले आहे सध्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचा ऊस पिकात पाणी साचले आहे या सर्व उसाचे नुकसान होऊ नये म्हणून कारखाना व्यवस्थापन प्रयत्न करणार आहे कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी साहेब यांनी माहिती दिली की गणित हंगाम २०२५/ २६ या यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कारखान्यातील देखभाल दुरुस्तीची सर्व कामे झालेली असून कारखाना काळपासाठी सज्ज झाला आहे. या अंगामातील उपलब्ध ऊसाची गाळप होण्यासाठी कारखान्याची आवश्यक असणारी तोडणी वाहतूक यंत्रणा उभारले आहे या वेळीथ हंगामात कारखाना सुमारे प्रतिटन ९५०० मीटर ऊस गाळप. करणार असून करार केलेल्या तोंडी वाहतूक यंत्रणे कडून पुरेसा उसाचा पुरवठा केला जाणार आहे. यामुळे कारखाना पहिल्या दिवसापासून पूर्ण कार्यक्षमतेने चालवणार आहोत. साठी आवश्यक असणाऱ्या तोडणी वाहतूक यंत्रणेच्या आडवांस हप्त्याची ही वाटप कारखाने केली आहे.


या कार्यक्रमास कारखान्याची संचालक श्री दिनकरराव मोरे, श्री दिलीपराव चव्हाण, श्री उमेश परिचारक, श्री ज्ञानदेव ढोबळे, श्री तानाजीराव वाघमोडे, श्री बाळासो यलमार, श्री लक्ष्मण धनवडे, श्री भास्कर कजगावडे, श्री भैरू वाघमारे गंगाराम विभूते श्री सुदाम मोरे विजय जाधव, हनुमंत कदम श्री किसन सरवदे, श्याम राव साळुंखे, श्री मधुकर पाटील तज्ञ संचालक, श्री दाजी भुसनर पाटील, श्री दिनकर गुरव, व कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी, अधिकारी कर्मचारी अधि मोठ्या संख्येने उपस्थित होते.




मान्यवरांची उपस्थिती

## म. गांधी व शास्त्री यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास या विषयावर प्रबोधन

# म. गांधींनी सत्य आणि अहिंसा या तत्त्वाने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. : प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : कौटुंबिक हितापेक्षा देश हिताला दोघांनी प्राधान्य दिलं. सत्याग्रह, अहिंसा, राष्ट्रीय एकात्मता, स्वावलंबन, स्वदेशी या तत्त्वाचा सातत्याने त्यांनी पुरस्कार केला. सत्तेपेक्षा, पदापेक्षा, देश हिताला त्यांनी प्राधान्य दिलं. जनतेच्या सुखदुःखाशी समरस होता आलं पाहिजे. सत्ता आणि संपत्ती पासून दूर राहून ही महात्मा होता येत हे गांधींनी जगाला दाखवून दिलं. महात्मा गांधींनी सत्याग्रह आणि अहिंसेला एक शक्तिशाली नैतिक आणि राजकीय साधन म्हणून जगासमोर मांडले. त्यांनी सत्य आणि अहिंसा या तत्त्वाने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांचे जीवन कार्य पाहता खऱ्या अर्थाने म. गांधी व शास्त्रीजी हे नैतिकतेचे दीपस्तंभ होते असे प्रतिपादन प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

ते लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, व ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीच्या पूर्वसंध्येला ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात म. गांधी व शास्त्री यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास या विषयावर प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक यक्कलदेवी हे होते.

यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल चे अध्यक्ष ला. प्रा. डॉ. स्वामीनाथ कलशेट्टी, ला. चंद्रकांत यादव, डॉ. राजीव प्रधान, प्रा. डॉ. नी जॉन, प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. डॉ. करुणा राऊत, प्रा. दरेप्पा बताले आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना येळेगावकर म्हणाले की, स्वतंत्र्य भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महिलांचा समावेश व्हावा यासाठी म. गांधी आग्रही होते. शास्त्री यांच्या विषयी सांगताना ते म्हणाले लाल बहादूर शास्त्री हे स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी आपल्या 'जय जवान, जय किसान' घोषणेतून जवान आणि शेतकऱ्यांचा गौरव केला. ते साधे आणि प्रामाणिक जीवन जगले, जे आजही अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. लाल बहादूर शास्त्री त्यांच्या शांतताप्रिय स्वभावामुळे 'शांतीदूत' म्हणून ते ओळखले जातात. शेवटी अध्यक्षीय समारोप प्राचार्य अशोक यक्कलदेवी यांनी केला.

कार्यक्रमाचे स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अमिता जावळे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. शंकर राजे यांनी मानले.